महाराष्ट्र शासन
GRANT GOVT. MEDICAL COLLEGE &
SIR J.J.GROUP OF HOSPITALS,MUMBAI
ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समुह रुग्णालये, मुंबई
Tel.No.373 55 55, 373 1144 e-mail – deangmcjjh@gmail.com

जा.क्र.जजीरु/मज्योफुजआयो/कंत्राटीपदेजाहिरात/डीईओ/५१२३/२०२६ दि. ५.०६.२०२६

# -: जाहिरात :-

अधिष्ठाता, ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी. समुह रुग्णालये, मुंबई यांच्या एकत्रित महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनांतर्गत करीता थेट मुलाखतीद्वारे खालील तक्त्यात नमुद केलेल्याप्रमाणे कंत्राटी कर्मचारी भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कंत्राटी कामगाराचे पद | शैक्षणिक अर्हता | एकूण संख्या (कंत्राटी) | वयोमर्यादा | रक्कम (दरमहा निश्चित वेतन ) |
|---|---|---|---|---|---|
| १ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | १) किमान १२ वी उत्तीर्ण व कमाल कोणत्याही शाखेतुन पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार (बीए. ,बीकॉम, बीएससी व बीपीएमटी त्यावरील उच्च शैक्षणिक अर्हता धारण केलेले उमेदवार)<br>२) एम.एस.सी.आय.टी.प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण<br>३) मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० श.प्र.मि. या अर्हतेचे शासकीय वाणीज्य प्रमाणपत्राचे अथवा शासनाने या उद्देशासाठी समकक्ष म्हणून घोषीत केले आहे असे अन्य कोणत्याही संस्थेने दिलेली प्रमाणपत्र धारण करीत असेल असा उमेदवार, पदवीधरांस प्राधान्य | १० | वय वर्षे ३८ पर्यंत फक्त (३१.०५.२०२६ रोजी) | १०,०००/- (निश्चित वेतन) |
| २ | शिपाई | किमान ७ वी उत्तीर्ण व कमाल १० वी उत्तीर्ण | २ | वय वर्षे ३८ पर्यंत फक्त (३१.०५.२०२६ रोजी) | रु.६०००/- (निश्चित वेतन) |

## सर्वसाधारण अटी :

१) वरील नमुदप्रमाणे कामगारांच्या संख्येत कमी / जास्त बदल होणारे आहेत.
२) निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असून ती राज्यशासनाकडील पदे नसल्याने कायमस्वरुपी समावेशन होणार नाही.
३) एम.एस.सी.आय.टी. प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
४) कामाचा अनुभव ग्राहय धरला जाईल.
५) जाहिरातीत नमूद केलेल्या पदांच्या संख्येत बदल करणे, पद भरणे किंवा न भरणे/प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार हे संस्थेने राखून ठेवले आहेत.
६) उमेदवारांना निवडीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.
७) उमेदवाराने मुलाखतीस येतांना सर्व मुळ कागदपत्र व त्यांच्या साक्षांकित केलेल्या प्रतींसह महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना, सर ज.जी.समुह रुग्णालये, मुंबई येथे मुलाखतील उपस्थित रहावे.
८) सदर भरती प्रक्रियेअंतर्गत निर्माण होणाऱ्या बाबींवर मान.संस्थाप्रमुख यांनी घेतलेले निर्णय अंतीम असतील.

## विशेष सुचना

१) निवड झालेल्या उमेदवारांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती तथा आदेश स्विकारण्यापासून १२० दिवसांकरीता देण्यात येतील.

२) सदर नियुक्त्या काम समाधानकारक असल्यास १ दिवसाचा खंड देवून जास्तीत-जास्त ३६४ दिवसांपर्यंत चालू ठेवण्यात येतील.

३) उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभव प्राप्त करणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

४) प्रशासकिय किंवा अन्य कारणास्तव निवड (भरती) प्रक्रिया कोणात्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचा अधिकार अधिष्ठाता ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी. समुह रुग्णालये, मुंबई यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेला आहे.

५) निवड झालेल्या उमेदवारांना निव्वळ कंत्राटी (करार) नियुक्त्या देण्यात येत असल्याने त्या कधीही व केव्हाही कमी करण्यात येतील त्यांवर त्यांना कोणताही कायम स्वरुपाचा हक्क सांगता येणार नाही.

६) वर नमुद केलेल्याप्रमाणे सर्वांना वेतन निश्चित स्वरुपातील आहे (कंत्राटी वेतन).

७) कामगारांना तीन पाळयांमध्ये डयुटी राहील.
कामाची वेळ सकाळी ८:०० ते संध्याकाळी ५:००
दुपारी २:०० ते रात्री १०:०० वाजेपर्यंत आणि रात्री १०:०० ते सकाळी ८:०० पर्यंत.

८) **अर्ज विहीत नमुन्यात भरुन खाली दिलेल्या ईमेल आयडीवर पी.डी.एफ.(PDF) स्वरुपात दि.२१.०६.२०२६ रोजी रात्री १२:०० वा. पर्यंतच सादर करावा**. दिलेल्या कालावधीनंतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाही.(अ) ज्या पदासाठी अर्ज करीत आहात त्या पदाचे नांव ब) पुर्ण पत्ता, दुरध्वनी / भ्रमणध्वनी ई-मेल आयडी ड) जन्म दिनांक (शालांत परीक्षा प्रमाणपत्रावरील) इ) शैक्षणिक अर्हता/कोर्स, कोठून उत्तीर्ण केलेत त्या संस्थेचे अथवा विद्यापीठाचे नाव, उत्तीर्ण वर्ष, गुण, टक्के) कामाचा अनुभव पदनिहाय. वर्ष / महिने मोबदला किती मिळत होता. इ. आदेशानुसार माहिती अर्जात नमुद करावी.)

९) **अर्जासोबत सर्व कागदपत्रे, पारपत्र आकाराचे दोन फोटो, काम केलेल्या बददल अनुभव प्रमाणपत्राच्या प्रती (सांक्षाकीत केलेल्या) यासह भरलेला अर्ज थेट मुलाखतीकरीता मंगळवार दिनांक २४ जून, २०२६ रोजी उमेदवाराने स्वतः लेखा कक्ष, एकत्रित महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, सर ज.जी.समुह रुग्णालये, मुंबई.४००००८ येथे उपस्थित रहावे.**

मुलाखतीची दिनांक :- २४.०६.२०२६
**मुलाखतीची वेळ :- सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत राहील.**
ईमेल आयडी :- **mjpjayrecruitment2026@gmail.com**

**मुलाखतीचे ठिकाण :**
महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना कार्यालय,
मुख्य इमारत, तळमजला
ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी. समुह
रुग्णालये, मुंबई. ४०० ००८

**अधिष्ठाता**
ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
सर ज.जी. समुह रुग्णालये
मुंबई. ४०० ००८.